
# आनंद संजीवनी



प्रथमावृत्ती २७-८-८६
द्वितीयावृत्ती १-१-८८

कवियत्री - श्रीमती आशालता वेलणकर
प्रकाशक - श्री. प्रबोध वेलणकर

किंमत - २/- रु.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | मंगलमय मूर्ती गणेशाची | १ |
| | भजन | १ |
| २) | नामसुखाची राशी | २ |
| ३) | हरि ॐ हरि ॐ हरि ॐ गाता | २ |
| ४) | मन हे हरि रंगी रंगले | ३ |
| ५) | मनाला पाहिजे पटवायला | ३ |
| ६) | गोड आहे भगवंताचे नाम | ४ |
| ७) | रामनाम गोड | ४ |
| ८) | आनंद स्वरूप | ५ |
| ९) | मधुर मधुर रामनाम | ५ |
| १०) | दास्य करावे भगवंताचे | ६ |
| ११) | रामनाम हेचि सार | ६ |
| १२) | देवा नाव सांग ना | ७ |
| १३) | दावियली मज वाट | ७ |
| १४) | कशाला दोष द्यावा दुसऱ्याला | ८ |
| १५) | पाहिजे ना शाश्वत सुख | ८ |
| १६) | राम आणखी कृष्ण | ९ |
| १७) | आम्ही भिकारी (भारूड) | १० |
| १८) | गोकुळीच्या राजा कृष्णा | ११ |
| १९) | होईन मी मुरली | ११ |
| २०) | नामाचिया नादे नाचे नारायण | १२ |
| २१) | गडावरी देव माझा | १२ |
| २२) | दुर्बलतेंचे निमित्त करुनी | १३ |
| २३) | देवा तुझी वाजव मुरली | १४ |
| २४) | हरि ॐ तत् सत् | १५ |

२५) नाम घेता जातो मळ १५
२६) मनास वाटे सदैव गावे १६
२७) काहीतरी करून (भजन) १६
२८) हरिनाम मधु वाचे १७
२९) मम मुखी नाम वसो १७
३०) गळा तुळशीमाळा १८
३१) नारायण नारायण भजत जा सदा १८
३२) भजन आणखी भोजन १९
३३) लोखंडाची चूक २०
३४) जय जय रघुवीर समर्थ २०
३५) अहो मी झाले संन्याशी (भारूड) २१
३६) कृष्ण हरे जय २१
३७) कोठे जावे काय करावे २२
३८) उद्धवा नकोस भुलवू मला २२
३९) दर्शन दे मजला २३
४०) हरि ॐ हरि ॐ हरि ॐ गावा २४
आनंद (भजन) २४
४१) गोकुळीच्या गौळणी २५
४२) लागो मनाला ओढ २५
४३) मना तू समजून घे गीता २६
४४) कृष्ण जीवीचा सखा २६
४५) नवविधा भक्ति २७
४६) ऐक मना ऐक मना २८
भजन २८
४७) मना तू समजून घे नेटे २९
४८) बटाटा चिवडा घ्यावा ३०
४९) सहा साधने ३१
५०) कृष्ण गोविंद, गोविंद ३२

" आमच्यावर सुंदर संस्कार

लेणी घातली त्या

परमपूज्य

मातोश्रीस

अर्पण "

# मनोगत

'आनंद संजीवनी' झपाट्याने जनतेच्या मानसांत जाऊन पोहोचली. तोंडी अभिप्राय तर शेकडोच्या संख्येने आले. म्हणूनच वर्षभराचे आत द्वितीय आवृत्ती काढावी लागत आहे. ज्यांनी लेखी अभिप्राय कळविले त्यांची मी ऋणी आहे.

द्वितीय आवृत्तीकरिता उद्युक्त केले अशा वाचक बंधू-भगिनींची पण मी ऋणी आहे. भगवंताने अशीच सेवा नित्य घ्यावी हीच आंतरिक इच्छा.

कवियत्री
**श्रीमती आशालता वेलणकर**
मुरलीधर मंदिर, कानसई विभाग,
अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१

# अभिप्राय

१) अंतर्बाह्य भक्तिने प्रेरित झाल्याचा परिणाम म्हणजे उत्कटता. त्यातून जन्मली भाव कविता. सर्वच पदे गेय, प्रासादिक आहेत. बालकांचा लडिवाळपणा काही काव्यात आढळला. काही काव्यातली कल्पकता बरीच मोहक आहे.

**सौ. रत्नप्रभा जोशी**, (एम्. ए.)
सांताक्रूझ

२) 'आनंद संजीवनी' काव्य संग्रहात ईश्वरी साक्षात्काराच्या खुणा आढळल्या. उपदेश, आतुरता, तळमळ, अनुभूती या सर्व अवस्थांचा अविष्कार भावपूर्ण व्यक्त झाला आहे.

**डॉ. आर्. व्ही. चिटणीस**, डोंबिवली

३) 'आनंद संजीवनी' हा काव्य संग्रह भक्ति रसाचे लेणे लेवून साधकांना मार्गदर्शक ठरणारा संग्रह आहे. काव्य सुबोध रसाळ व प्रेमळ आहे.

समर्थप्रेमी
**श्री. सुनील चिंचोलकर**
**सौ. सुनिता चिंचोलकर**
सज्जनगड

४) काव्य संग्रहाचे नांवच गोड आहे. 'आनंद संजीवनी'. आतील कविताहि मनाला जाऊन भिडणाऱ्या, रोजच्या साध्या सोप्या भाषेतील आहेत.

**श्री. द्वा. वा. केळकर**, पुणे
संयोजक प. दा. अ. उपक्रम

५) सर्वही काव्यात भक्ति, ज्ञान, वैराग्य यांचा संगम आढळून येतो. प्रासाद युक्त व ऋजुता असलेली आनंद संजीवनी फोफावून वाढो हीच सदिच्छा.

**सौ. रजनी लिमये,** नासिक

६) 'आनंद संजीवनी 'तील काव्ये प्रत्यक्ष अनुभव, आर्तता, ज्ञान याच बरोबर नाम यावर आधारलेली आहेत. काही उपदेशपर काव्ये आहेत. कवियत्रीचे हृदयातील भाव कप्पे सहज उकलले गेले आहेत. काव्यांचे चिंतन केले तर 'आनंद संजीवनी ' निश्चित प्राप्त होईल.

संचालक सेवाश्रम

**सेवानंदजी,** भुसावळ

# मंगलमय मूर्ती गणेशाची

मंगलमय मूर्ती गणेशाची मंगलमय मूर्ती
गाऊ अखंडीत नाम तयाचे
पुजुनी करू या पंचारती ।।ध्रु।।

कासे पितांबर कुसुमी शेला
हिरे माणके मुगुटावरती ।।१।।

मौत्तिकमाला वक्षावरती
सुवर्ण तोडे करी शोभती ।।२।।

पुष्प लाल अन् जुडी दुर्वांची
त्रिपुंड भाळी शेंदूर वरती ।।३।।

मोदक राशी विघ्न हरासी
देता, येईल मूषकावरती ।।४।।

आशा वंदीत गजवदनासी
अहंकार मज नसू दे जगती ।।५।।

## (भजन)

शिवतनया, नमिते तव मी पाया
ये ये गणराया –२–

२

## नामसुखाची राशी

नाम सुखाची राशी ।।ध्रु।।

नाम घेता निश्चयाने
भेटे ब्रह्म अविनाशी ।।१।।

साधनेत सुलभ साधना
नाम घ्यावे अहर्निशी ।।२।।

आशा लीन सद्‌गुरुचरणी
भेटी झाली अमृताशी ।।३।।

३

## हरि ॐ हरि ॐ हरि ॐ गाता

हरि ॐ हरि ॐ हरि ॐ गाता
सहजानंद येतो हाताऽऽ हरि ॐ ।।ध्रु।।

आनंद बगिचा फुलू लागतो
सुगंध अवती भवती पसरतो हरि ॐ ।।१।।

भीती सावट दूर होते
प्रिती मनातील वाढू लागते हरि ॐ ।।२।।

गुरुकृपेचा अनुभव जीवनी
म्हणते आशा हीच संजिवनी हरि ॐ ।।३।।

४

# मन हे हरि रंगी रंगले

मन हे हरि रंगी रंगले ।।ध्रु।।

होता सद्‌गुरु बोध सुकाळ
समूळ गेले भ्रांती पडळ
भय न मुळीच उरलेऽऽ ।।१।।

अवती भवती हरीच नटला
दुजेपणाचा भाव मिटला
मी तू पण गळलेऽऽ ।।२।।

वैर मत्सर त्वरित गेले
आशा म्हणे मग हाती आले
शांतिरस पेलेऽऽ ।।३।।

५

# मनाला पाहिजे पटवायला

मनाला पाहिजे पटवायला हो पटवायला
रामनाम हे घोटवायला हो घोटवायला
नामाने होतय सगळंच काम हो सगळंच काम
नामाला नाही पडत दाम हो पडत दाम

६

## गोड आहे भगवंताचे नाम

गोड आहे भगवंताचे नाम नाम नाम
मोजावे त्या लागत नाही दाम दाम दाम ।।ध्रु।।

सर्वंही म्हणती छळीतो आम्हा काम काम काम
त्यासी जिंकू मुखी असता राम राम राम ।।१।।

सद्‌गुरुबोधे जाणू आत्माराम राम राम
तरीच पाहता येईल परंधाम धाम धाम ।।२।।

आशा विनवी पाहू मेघःश्याम श्याम श्याम
हाची जीवाचा खरा खरा विश्राम विश्राम ।।३।।

७

## रामनाम गोड

रामनाम गोड, विषय अवघे सोड
संत संगती जोड, दुर्गुण होतील रोड ।।१।।

कृष्ण नाम गोड, त्याला नाही तोड
वाढेल भक्ती मोड, संशय दुर्ग फोड ।।२।।

प्रभू नाम गोड, स्वानंदाचे खोड
वाढो नित्य कोड (आवड)
हीच लावू होड (पैज) ।।३।।

८

# आनंद स्वरूप

आनंद स्वरूप तुझे मानवा, आनंद स्वरूप तुझे ।।ध्रु।।

सुख दुःख नित मानिसी जरी तू
दोन्ही मिथ्या असे । मानवा ।।१।।

हरिनामाची नौका तुजसी
तारील बहु भरवसे । मानवा ।।२।।

क्रोधावरी तू क्रोध करीत जा
भगवंत हृदयी वसे । मानवा ।।३।।

तुझा तुची मधु अनुभव पाहे
परम सुख ते कसे । मानवा ।।४।।

गुरुचरणाचे स्मरण करावे
आशा विनवीतसे । मानवा ।।५।।

९

# मधुर मधुर रामनाम

मधुर मधुर रामनाम, मधुर मधुर कृष्णनाम
घेई बा जीवाऽऽऽ ।।ध्रु।।

म्हणसी जया भवसागर । दुस्तर ना भ्रम करी दूर ।।१।।

विषयांचा संग सोड । शंकेचा दूर्ग फोड ।।२।।

गुरुबोधा विसरू नको । काळ व्यर्थ दवडू नको ।।३।।

आशा गुरु पदी लीन । बोधामृत डोही मीन ।।४।।

१०

# दास्य करावे भगवंताचे

दास्य करावे भगवंताचे होईल जीवन सफल
दान करावे सर्वस्वाचे देहाभिमान विफल ॥१॥

तंबी देऊनी कुविचारांना घालवावे दूर
बाष्कळ बडबड नकोच, भक्तीला येऊ दे पूर ॥२॥

खुषीत असता मन आपुले वळवावेच हळू
सोस कशाला हवा जीवनी विवेक पडताळू ॥३॥

डाव सुखाचा कधी दु:खाचा येता जीवनी
विवेक जागा ज्याचा, तोचि भाग्यवान जनी वनी ॥४॥

संदेश – **दादा तंबाखु सोडावी.**

११

# रामनाम हेचि सार

रामनाम हेचि सार, मना रे, रामनाम हेचि सार
भवसागर हा दुस्तर फार । सहजचि होशील पैलपार ॥ध्रु॥
श्रवणापरते साधन नाही । श्रवणे जाती दोष सर्वही ॥१॥
यम नियमांचे करिता पालन । जीवन होईल गंगेसमान ॥२॥
मनन करावे मन न व्हावे । प्रभु चरणाचे ध्यान करावे ॥३॥
आशा मनीची हीच विनवणी । लीन व्हावे सद्गुरुचरणी ॥४॥

१२

## देवा नाव सांग ना

देवा नाव सांग ना तुझे गाव सांग ना ॥ध्रु॥
माझ्यासाठी रात्रंदिन तू खटपट करितोसी
काया माझी रक्षिण्यास्तव बहुत शिणलासी ॥१॥

वेद म्हणती अनामिक तू सहस्त्र नामी तू
संत सांगती अजन्मा तू रूपधारी तू ॥२॥

सगुणरुपे अवतरोनी भक्ता तारीसी
नाव ज्याचे घ्यावे तो तू नाही म्हणतोसी ॥३॥

विश्वचालक विश्वपालक जगदात्माचि तू
सद्‌गुरु कृपे यावी प्रचिती आशा मनी हेतू ॥४॥

१३

## दावियली मज वाट

दावियली मज वाट । हरिने दावियली मज वाट ॥ध्रु॥
जीवन यात्रा वाटे मजला । भरला तम घनदाट ॥१॥
साधन करिता पहाता येतो । मधूर भक्तीचा थाट ॥२॥
नामाधारे सहज चढावा । प्रतिकुलतेचा घाट ॥३॥
शुद्ध करोनी मन बुद्धिला । फिरू विश्वाचा हाट ॥४॥
आशा म्हणे गुरुकृपे हाती मम । स्वानंदाचे ताट ॥५॥

## १४

# कशाला दोष द्यावा दुसऱ्याला

कशाला दोष द्यावा दुसऱ्याला ॥ध्रु॥
कर्म आपुले दैव आपुले
परब्रह्म सर्वत्र संचले । दूर करू द्वेषाला ॥१॥

सुख सुख म्हणता दुःख अवचिता
भगवंताला निशिदिनी ध्याता । हटवू मत्सराला ॥२॥

पैसा हवासा वाटतो कसा
जीवासी करितो वेडा नी पिसा । विसरू वैरभावाला ॥३॥

द्वेष मत्सर वाढविती वैर
वागणूक ना व्हावी स्वैर । आशा विनवी ईशाला ॥४॥

## १५

# पाहिजे ना शाश्वत सुख

पाहिजे ना शाश्वत सुख । मना, तू व्हावे अंतर्मुख ॥ध्रु॥
सभोवतीचा विश्वपसारा । जणू मोराचा फुलला पिसारा
रंग बदलतील गळतील पंख ॥१॥

दिसते जे तुज अवती भवतीचे । श्रीहरीचे ते रूपचि साचे
भाव बदलता जाईल दुःख ॥२॥

प्रभू कार्यास्तव वेच क्षण क्षण । तरीच होईल भगवद्दर्शन
सद्गुरुबोधे आशेला हरिख ॥३॥

## १६

# राम आणखी कृष्ण

राम आणखी कृष्ण यातुनी कोण आवडे अधिक तुला ?
सांग मला ग सांग मला ॥ध्रु॥

दह्यादुधाची करितो चोरी । गोपी संगे खेळे भारी
हाती जयाच्या सदा बासरी । गाई नेतो रानाला
राम आवडे अधिक मला ॥१॥

आकाशीचा चंद्र पाहुनी । हट्ट धरितो तया लागुनी
खूष होतसे पाहुनी अयनी । बुद्धि नाही रामाला
कृष्ण आवडे अधिक मला ॥२॥

अष्ट नायिका असती ज्याला । सोळा सहस्त्र नारी केल्या
गोकुळीच्या भुलवितो गोपीला । भाव विठ्ठल करी राधेला
राम आवडे अधिक मला ॥३॥

एक पत्नी एऽऽक बाणी । सीता घेऊनी जाई तो वनी
गमवी सीता मृगा लागुनी । दुबळा रडतचि तो फिरला
कृष्ण आवडे अधिक मला ॥४॥

दुष्ट कपटी आणि नाटकी । बाजूस राहून करी घातकी
पांडवा घरी कामे हलकी । केली तो का देव भला ?
राम आवडे अधिक मला ॥५॥

वानर अस्वल ते मिळवुनी । रावण राक्षस दळ मारोनी
सीता मिळवुनी पुन्हा त्यागिली । सांग मला तो का देव भला?
कृष्ण आवडे अधिक मला ॥६॥

रामकृष्ण जरी भिन्न भासती । परब्रह्म अवतार प्रकृती
जे जे भक्त तयासी ध्याती । मिळवुनी घेती स्वरूपाला
राम आवडे अधिक मला
कृष्ण आवडे अधिक मला । दोघे आवडती आशाला ॥७॥

१७

# आम्ही भिकारी (भारूड)

आम्ही भिकारी भिकारी संतादारचे भिकारी हो
संतादारचे भिकारी ॥ध्रु॥

आमुचे हातीचा अहंकाराचा लोटा
घेऊनी देती ज्ञानदीप मोठा ॥१॥

आमुचे हातीची चौपदरी झोळी
घेऊनी देती स्वानंदाची पोळी ॥२॥

आमुचे हातीचा द्वेषाचा सोटा
भिरकावुनी देती, आणि दाविती
शुद्ध प्रेमाचा साठा ॥३॥

आमुच्या सुखदु:खाच्या झांजा बद्द
बदलून देती प्रभूनाम शुद्ध ॥४॥

आमुच्या अंगीची तृष्णा वस्त्रे जीर्ण
फाडून देती नूतन वस्त्रे समाधान पूर्ण ॥५॥

संत सांभाळिती आमुची वासना लेकुरे
श्रीगुरु भागीरथी चरणी आशा मन विरे ॥६॥

१८

# गोकुळीच्या राजा कृष्णा

गोकुळीच्या राजा कृष्णा । गोपाळांच्या सवंगड्या ॥धृ॥
जनाबाईचे दळण दळीता । पांघरून जाशी गोधड्या ॥१॥
सखूबाईने धुणे धुता । उन्हात वाळवुनी घालिसी घड्या ॥२॥
मीराबाईने विष पिता । आनंदाने मारिशी उड्या ॥३॥
बहिणाबाईचा भोळा भाव । पाहुनी भुललासी भाबड्या ॥४॥
राधेचा तू राधा तुझी । परि लपलासी सोंगड्या ॥५॥
सद्‌गुरु पदी लीन आशा । अज्ञानाच्या तोडी बेड्या ॥६॥

१९

# होईन मी मुरली

होईन मी मुरली, प्रभू करी, होईन मी मुरली ॥धृ॥
भगवंता मज घेशील का करी ?
शंकीत होते मन वरचेवरी
दे तव भक्तांची साऊली । प्रभू करी होईन मी मुरली ॥१॥
तुझिया नामाची अति महती
संत महात्मे गाती नी वदती
प्रीति मनी उपजली । प्रभू करी होईन मी मुरली ॥२॥
अज्ञानाने खचत मी होते
अभिमानाने पिचत मी होते
भेटली गुरुमाऊली । प्रभू करी होईन मी मुरली ॥३॥

२०

## नामाचिया नादे नाचे नारायण

नामाचिया नादे नाचे नारायण । नाचे नारायण
वदता गर्जोन नाम मुखे । नाम मुखे ॥ध्रु॥

धावते धाऊ द्या मन धांदरट । मन धांदरट
धरील अनंत त्यासी सुखे । त्यासी सुखे ॥१॥

सकल जन्माची सरती साकडी । सरती साकडी
साधता ही घडी नुरती दुःखे । नुरती दुःखे ॥२॥

साधनी साधन नाम हे सुलभ । नाम हे सुलभ
आशा म्हणे लाभ होता हरिखे । होता हरिखे ॥३॥

२१

## गडावरी देव माझा

गडावरी देव माझा आहे श्री समर्थ
लग्नाची तोडूनी बेडी जाणे जीवनार्थ ॥ध्रु॥

पळे जरी बोहल्यावरुनी सावध झाला पूर्ण मनी
रामनाम हाचि आहे परम सुलभ अर्थ ॥१॥

पुरश्चरण एक तप तेरा कोटी नाम जप
हाकारूनी जगा सांगे जय जय रघुवीर समर्थ ॥२॥

प्रयत्न हाचि साच देव आनंदाचे फुटते पेव
आळसात एकहि क्षण घालविला नाही व्यर्थ ॥३॥

साधनेत साधना ती नाम महती संत गाती
रामपदी मन रमो आशा साधी हाचि स्वार्थ ॥४॥

२२

# दुर्बलतेचे निमित्त करुनी

दुर्बलतेचे निमित्त करूनो,
सोडू नको साधना
प्रयत्न प्रत्यय दुवा जोडुनी
वेची तन मन धना ॥ध्रु॥

दे धडक तू बेधडक, घालविण्या क्रोधाला
क्रोधाचा प्रिय सखा आळस
ओळख तू त्याजला ॥१॥

अज्ञानासह पार जाऊ दे, अंगीचा आळस
इतराजी जरी जाहली समाजी
कृपा करील तो ईश ॥२॥

उशीर कशाला ध्येय साधण्या, समय आला ऊठ
एक एक क्षण मोलाचा
सत्कार्यी लावी नीट ॥३॥

येईल भरती आनंदाला, तोडू माया पाशा
विनती करिते प्रभूचरणाशी
ही लीन आशा ॥४॥

२३

# देवा तुझी वाजव मुरली

देवा तुझी वाजव मुरली हो ऽऽऽओ
क्रृष्णा तुझी वाजव मुरली ॥ध्रु॥

संसाराचा आला वीट । केली बहु आटापीट
आले तुझ्याकडे पहा माझ्याकडे
तूचि माझी माऊली होऽऽऽकृष्णा ॥१॥

अज्ञानाच्या भोवऱ्यात । जीव माझा गोते खात
आले तुझ्याकडे पहा माझ्याकडे
तूचि माझी माऊली होऽऽऽकृष्णा ॥२॥

संदेहाची माझी होडी । नेईल का मज पैलथडी
आले तुझ्याकडे पहा माझ्याकडे
तूचि माझी माऊली होऽऽऽकृष्णा ॥३॥

चित्ती वसो तुझे ध्यान । हारपो माझे देहभान
आले तुझ्याकडे पहा माझ्याकडे
तूचि माझी माऊली होऽऽऽकृष्णा ॥४॥

श्री भागीरथी गुरु माऊली । हीच तुझी कृपा साऊली
आले तुझ्याकडे पहा माझ्याकडे
तूचि माझी माऊली होऽऽऽकृष्णा ॥५॥

## २४

# हरि ॐ तत् सत्

हरि ॐ तत् सत् । ॐ हरि तत् सत्
हरि ॐ तत् सत् बोऽऽऽला
हरि ॐ तत् सत् । ॐ हरि तत् सत्
हरि ॐ तत् सत् बोऽऽऽला ॥ध्रु॥

सुखदुःखाच्या लोभस दोऱ्या । संकल्पाचा झोऽला
वरती गेला खाली आला । हरि ॐ तत् सत् बोऽऽला ॥१॥

अज्ञानाने सत्य मानिले । माया आभासाला
ज्ञान जहाले भास उडाला । हरि ॐ तत् सत् बोऽऽला ॥२॥

मन बुद्धिसह शरण जाऊ या । अनन्य भगवंताला
सद्‌गुरु बोधे जणू त्याला । हरि ॐ तत् सत् बोऽऽला ॥३ ॥

कणाकणांत जो मणामणातहि ।लपुनी कैसा बैसला
आशा म्हणे त्या पाहू चला । हरि ॐ तत् सत् बोऽऽला ॥४॥

## २५

# नाम घेता जातो मळ

नाम घेता जातो मळ । मन होईल निर्मळ ॥ध्रु॥
नाम घेतले ना मुळी । मन विषय उगाळी ।
नाम घेता जरा जरा । मन धावे सैरावैरा ।
नाम घेता थोडे थोडे । मन चिंतनाने वेडे ।
नाम घेता सदोदित । सुख येईल शोधीत ।
नाम साराचे ते सार । आशा मन होई स्थीर ।

## २६

# मनास वाटे सदैव गावे

मनास वाटे सदैव गावे गोविंदाचे नाऽऽम
मुकुंद माधव मेघःश्याम, मुकुंद माधव मेघःश्याम ॥ध्रु॥

माता देवकी शुद्ध सद्‌गुणी
दुजी माता ती नंद राणी
दो मातांचा बाळ गुणी । सजवितो सकलांचे धाम ॥१॥

गोकुळी गोपासवे खेळला
गोपी संगे नाचनाचला
प्रभूपण आपुले क्षणी विसरला । सकल जिवीतांचा आराम ॥२॥

भक्तासाठी रूप बदलतो
प्रेमासाठी चाकर बनतो
सद्‌गुरु कृपे प्रचीत देतो । आशेचे निजधाम ॥३॥

## २७

# काहीतरी करून (भजन)

काही तरी करून कसतरी करून
भक्ति मार्गाला लागायचं हो ॥ध्रु॥

अनन्य भावे शरण जाऊनी
प्रभूला हृदयी साठवायचं ॥१॥

मी तू पणाचा भेद विसरुनी
जनी वनी प्रभूला पहायचं ॥२॥

२८

## हरिनाम मधु वाचे

हरिनाम मधु वाचे बोल बोल बोल
आनंदाने येतील मग डोल डोल डोल ॥ध्रु॥

भजनावीण जीवन माती मोल मोल मोल । हरिनाम ॥१॥

मायेचा हा डोह आहे खोल खोल खोल । हरिनाम ॥२॥

अहं ममता खचित रे फोल फोल फोल । हरिनाम ॥३॥

आशा तृष्णा फिरविती गोल गोल गोल । हरिनाम ॥४॥

विवेकाचा जाऊ नेदी तोल तोल तोल । हरिनाम ॥५॥

आशा कर्णी गुरुबोधाचा वाजे ढोल ढोल । हरिनाम ॥६॥

२९

## मम मुखी नाम वसो

मम मुखी नाम वसो, मुखी नाम वसो, मुखी नाम वसो
सदा नारायणा ॥ध्रु॥

घालवी अहंकारा । पावन देह खरा
चुकवी चौऱ्यांशी फेरा । शरण मी तव चरणा ॥१॥

पाहीन कणाकणांत । साठवीन मी हृदयांत
आनंद तव रुपांत । शरण मी तव चरणा ॥२॥

साहीन निंदेला । वाढवीन श्रद्धेला
ने पदी आशेला । शरण मी तव चरणा ॥३॥

३०

## गळा तुळशीमाळा

गळा तुळशी माळा भाळी बुक्का काळा
शोभतसे गळा वैजयंती ॥१॥
उभा विटेवरी कर कटीवरी
भक्तांचा कैवारी पांडुरंग ॥२॥
चंद्रभागे तटी उभा वाळवंटी
धावे उठाउठी भक्तकाजा ॥३॥
पुंडलिक वरदा, हरि विठ्ठलाचा
नामघोष वाचा वदे सदा ॥४॥
आशा म्हणे जगी नाही देव दुजा
पांडुरंग राजा पंढरीचा ॥५॥

३१

## नारायण नारायण भजत जा सदा

नारायण नारायण भजत जा सदाऽऽऽ ॥ध्रु॥
सांडुनिया अभिमाना । शरण जावे प्रभूचरणा
कमलनयन मनमोहना । ध्यात जा सदा ॥१॥
आळस दुरी सारुनिया । श्रवण मनन करुनिया
भामापति नंदतनया । पुजीत जा सदाऽऽऽ ॥२॥
चित्त स्थीर प्रभूचरणी । सद्विचार आचरणी
एक आस आशा मनी । नमित जा सदाऽऽऽ ॥३॥

# ३२

# भजन आणखी भोजन

भजन आणखी भोजन यातुनी
काय आवडे अधिक तुला । सांग मला ग सांग मला ॥ध्रु॥

भजन करीता होतो शीण । काय नडले देवावीण
उदर भरण्या हवे भोजन । म्हणुनी आवडे तेचि मला ॥१॥

रांधा वाढा करिता खटपट । आयुष्य जाते झटपट झटपट
यातच वाया जावे न जीवित । म्हणुनी आवडे भजन मला ॥२॥

नुसते बसून टाळ कुटून । मिळेल कैसा मान अन् धन
धनावाचुनी निष्फळ जीवन । म्हणुनी भोजन प्रीय मला ॥३॥

भोजनाने चळते रसना । वाढू लागते आपुली वासना
जन्ममरणा तीच कारण । म्हणुनी आवडे भजन मला ॥४॥

भजनाने का चुकते मरण । उगाच वाया जाती क्षण
भोजन करिते तनुबलवान । म्हणुनी आवडे तेचि मला ॥५॥

समाधान ही खरी संपदा । रामकृष्ण हरि जपा सर्वदा
भजन भोजन समसमान । करितो तोचि प्रिय प्रभूला ॥६॥

घेता भोजन नित्य नेमक । सद्‌गुरु कृपा करी सार्थक
तारक सर्वा प्रभूनाम एक । प्रचिती आली आशेला ॥७॥

## ३३

# लोखंडाची चूक

लोखंडाची चूक सांधते करीते एक पट्टी
मानव कर्तृत्वाची चूक बिघडविते गट्टी ॥१॥
चूक सोन्याची मिळणी करीते पाटलीच्या तोंडा
चूक शब्दाची गुन्हा करुनी फोडीते तोंडा ॥२॥
नाथांनी शोधिली प्रयत्ने एक पैची चूक
शब्द चूक परी नित्य भागवी द्वेषाची भूक ॥३॥
चूक एकची लहान अथवा महान जरी झाली
एका क्षणातचि अचूक प्रयत्ना डावलून घाली ॥४॥
आशा म्हणते जाहली जरी विस्मरणाची चूक
होवो प्रभू कृपा प्रसादे जीवन बिनचूक ॥५॥

## ३४

# जय जय रघुवीर समर्थ

भक्तिवीण जीवन व्यर्थ । जय जय रघुवीर समर्थ
आधी प्रपंच त्यांत परमार्थ । जय जय रघुवीर समर्थ
करू नये धनाचा स्वार्थ । जय जय रघुवीर समर्थ
घातास कारण अर्थ । जय जय रघुवीर समर्थ
झिजवू देह पर कार्यार्थ । जय जय रघुवीर समर्थ
करू काम राम प्रित्यर्थं । जय जय रघुवीर समर्थ
गुरु भागीरथी हेचि तीर्थ । जय जय रघुवीर समर्थ

## ३५

# अहो मी झाले संन्याशी (भारूड)

अहो मी झाले संन्याशी संन्याशी

समरस होईन ब्रह्माशी ॥ध्रु॥

विकारांचे मुंडण केले । उदासीनतेचे भस्म चर्चिले ।।ध्रु।।

सांडिली प्रपंच आटाआटी । त्याले ब्रह्मचिंतन छाटी ॥२॥

हाती विवेकाचा कमंडलू । घालविला अज्ञान कोलाहलू ॥३॥

हाती घेतला दीक्षा दंड । करीन ज्ञान यज्ञ उदंड ॥४॥

आसनासी मज मृगाजिन । संत वाक् सुधा नित्यप्राशीन ॥५॥

गुरु भागीरथी कृपा पाणी । लाभो सदा आशा विनवणी ॥६॥

## ३६

# कृष्ण हरे जय

कृष्ण हरे जय, कृष्ण हरे जय, कृष्ण हरे जय कृष्ण हरे

कृष्ण हरे जय, कृष्ण हरे जय, कृष्ण हरे जय कृष्ण हरे ॥ध्रु॥

सहनशीलता अंगी असू दे । क्रोध जिंकू एकसरे ॥१॥

प्रेम करू या भुताभुतावर । द्वेष हटवू परिवारे ॥२॥

लीन होऊनी शरण जाऊ या । अहंकार मग दूर सरे ॥३॥

उच्चाटण ते करू स्वार्थाचे । प्रभूपद सेवू दृढतरे ॥४॥

अज्ञान असुरा ठार करू या । सद्गुरु बोधे ज्ञान बरे ॥५॥

आशा भिकारीण भिक्षा मागते । पंच गुणांची सत्वरे ॥६॥

३७

## कोठे जावे काय करावे

कोठे जावे काय करावे कळत न मजला देवा
आत्मज्ञानी संत महात्मे वाटे त्यांचा हेवा ॥ध्रु॥
मनबुद्धिवर पगडा माझ्या गत संस्कारांचा
त्यातच गुंतीनी नाश होतसे मम आयुष्याचा ॥१॥
वाटते मजला सखेचि माझे क्रोध आणि काम
कशी करू मी सेवा तुझी म्हणती ज्या निष्काम ॥२॥
संत गाती तुझे पवाडे ऐकता वाटती गोड
परी न सुटती मनीचे माझ्या विषयांचे कोड ॥३॥
विषय जाणुनी दूर करोनी व्हावे मनी विरक्त
ओढ एकचि आशा मनीची होईन तव पदी आसक्त ॥४॥

३८

## उद्धवा नकोस भुलवू मला

उद्धवा नकोस भुलवू मला ॥ध्रु॥
देहाने जरी दूर मी परी । गोपाळ मम अंतरी
खचितरे, गोपाळ मम अंतरी ॥१॥
समीप जरी तू मधुसुदनाच्या गोष्टी ज्ञानाच्या
मुखी तव गोष्टी ज्ञानाच्या ॥२॥
वाट कुणाची पाहू आता । हृदयाची एकता
गुरु कृपे हृदयाची एकता ॥३॥

३१

# दर्शन दे मजला

दर्शन दे मजला माधवा,
दर्शन दे मजला मुकुंदा दर्शन दे मजला
आतुरले मी पाहीन नयना
दर्शन दे मजला गोविंदा दर्शन दे मजला ॥ध्रु॥

जनी वनी मज रूप दिसो तव
सेवा करुनी झिजवीन देह
करी कृपा मजवरी जगदीशा
वाढवी श्रद्धेला ॥१॥

म्हणोत कोणी मनासी चंचल
प्रमत्त आणि अतिशय चपल
आस मनी मी पाहीन माधव
दाखवी पदकमला ॥२॥

पूजीत आले प्रतिक तुझे मी
शांती लाभली कशास ना कमी
आशा मनीची आस एकली
येईन धामाला ॥३॥

## ४०

# हरि ॐ हरि ॐ हरि ॐ गावा

हरि ॐ हरि ॐ हरि ॐ गावा
हाचि मनाचा खरा विसावा ॥धृ॥

मन चंचल परि स्थीर होते
हरि ॐ हरि ॐ गुंजी घालते । हरि ॐ ॥१॥

विषय मनाचा हरीच व्हावा
नको कुणाचा हेवा देवा । हरि ॐ ॥२॥

मनास मानू मानू मनना
निर्मल होतील सकल वासना । हरि ॐ ॥३॥

सद्गुरु कृपा आहे पाठीशी
आशा सन्निध आनंद राशी । हरि ॐ ॥४॥

# आनंद (भजन)

आनंद भजनानंद, आनंद प्रेमानंद ।
आनंद नित्यानंद, आनंद स्वरुपानंद ।
आनंद आत्मानंद, आनंद अखंडानंद ।
आनंद ब्रह्मानंद, आनंद पूर्णानंद ।
आनंद, आनंद, आनंद, आनंद ॥

## ४१

# गोकुळीच्या गौळणी

गोकुळीच्या गौळणी आम्ही आलो कुंजवनी
चित्त आमुचे समर्पियेले, तुझ्याच रे चरणी ।।ध्रु।।

कुंजवनी आलोऽऽ अजि धन्य झालो
पूर्ण विसावलोऽऽ वेणू नाद श्रवणी । आम्ही ।।१।।

नंदाच्या नंदना ऐक मधुसूदना
दावी तव चरणाऽऽ साठवू रे नयनी । आम्ही ।।२।।

मानवी हे जीवन झाले मम धन्य
आशा हो पावन गुरुबोध वचनी । आम्ही ।।३।।

## ४२

# लागो मनाला ओढ

लागो मनाला ओढ
हरिची लागो मनाला ओढ ।।ध्रु।।

विषयांचा तो बागुलबोआ
क्षणांत होईल रोड । हरिची ।।१।।

संत संगती लाभता निशिदिनी
गळेल वासना मोड । हरिची ।।२।।

प्रपंच लटका माया लटकी
नाम प्रभूचे गोड । हरिची ।।३।।

आशा म्हणे नित गुरुचरणाच्या
गोडीस नाही तोड । हरिची ।।४।।

## ४३

# मना तू समजून घे गीता

मना तू समजून घे गीता ॥ध्रु॥

आत्मघातकी तीन शत्रू तुज
ठकशील रे पुरता ॥१॥

बहुगुणी काम रंगवील धाम
पिंगा घालील नुसता ॥२॥

सखा कामाचा क्रोध रे साचा
छळेल येता जाता ॥३॥

लोभस वाणा लोभ सुजाणा
देईल तुज रे गोता ॥४॥

गुरु संजीवनी लाभता जीवनी
आशा गाते गीता ॥५॥

## ४४

# कृष्ण जीवीचा सखा

कृष्ण जीवीचा सखा । हो माझा ।
कृष्ण जीवीचा सखा ॥ध्रु॥

नाम अमृत सेविता नित्य
विसर पडतो दु:खा ॥१॥

मी तू पणाचा भेद घालविता
वाण नाही सुखा ॥२॥

सद्‌गुरु कृपे आशा पुलकित
अनुभव येई निका ॥३॥

४५

# नवविधा भक्ति

श्रवण करी एकचित्त तरीच रे मना
सहज साध्य होईल रे तुला साधना ॥१॥

कीर्तन करी मनोभावे गाई ईशगुणा
दोष नाश होईल तू जाण सगुणा ॥२॥

विष्णूचे स्मरण तुला का न आवडे ?
सोड सोड विषयांचे कोड थोडे थोडे ॥३॥

पादसेवन भक्ति भली नित्य जोड अशी
आचरणी आण संत भावना कशी ॥४॥

अर्चन करी प्रभूचे तू वेच क्षण क्षण
प्रभू मूर्ती नटली रे पाही कण कण ॥५॥

वंदन करी सभोवार पाही जगदीश
नमनातचि मन न होते हाच आदेश ॥६॥

दास्य करी मनी ठेवोनी भाव सेवेचा
सेवा भाव हाच खरा मार्ग मुक्तीचा ॥७॥

सख्य हवे कोणाशी हेच जाण तू
सखा हो तू देवाचा देवच की तू ॥८॥

आत्मनिवेदन करण्या हवी अनन्यता
नवविधा भक्तीची हीच सांगता ॥९॥

प्रभू आपुल्या हृदयीच रे संत सांगती
आशा म्हणे कृपा गुरुची देई प्रचिती ॥१०॥

४८

# ऐक मना ऐक मना

ऐक मना ऐक मना विना साधवा
राहू नको समजून घे संतभावना ॥ध्रु॥

जीवन क्षण मोलाचा नाश नको करू
प्रभू प्रीति हा प्रसाद नको अंतरू ॥१॥

काळ कधी कोणास्तव थांबला असे
स्वस्थ बसे नाश त्याचा नियती करीतसे ॥२॥

दानाची महती जाणून करी समयदान
समयाचा सदुपयोग तत्व हे महान ॥३॥

आशा म्हणे सोडू नको नाम साधना
सतत ध्यास तुज लागो सांगते मना ॥४॥

## (भजन)

आळंदीची ज्ञानाई, देहुगांवची तुकाई
भक्तासाठी धावत येई पंढरीची विठाई
पैठणपूरची नाथाई, सज्जनगडची दासाई
भक्तासाठी धावत येई अयोध्येची रामाई

४७

# मना तू समजून घे नेटे

मना तू समजून घे नेटे ॥ध्रु॥

वरी वरी दिसले कर्म ही भले
खोटे ते खोटे ॥१॥

क्षण मोहाचा येता जीवनी
हाण विवेक सोटे ॥२॥

अज्ञानाची मरगळ झटकुनी
लाव तया वाटे ॥३॥

चित्त चिंतनी रमता निशीदिनी
शांति त्वरित भेटे ॥४॥

आशा म्हणे मग कोते विचार
गुरु कृपेने हटे ॥५॥

४८

# बटाटा चिवडा घ्यावा

बडबड बटाटे घेऊनी सुपात्री
शांती जलामध्ये उकडिले । हो, शांती...
टाकुनी दिधले साल निंदेचे
मनरूपी ताटी किसीयेले ॥१॥

टाकीला वाळत कीस उन्हामधे
भक्ति कर हा फिरविला । हो, भक्ति...
चिदानंदाची कढई घेऊनी
बोध घृतामधे तळीयेला ॥२॥

वरकड माया तिखट मीठ हे
घालुनी बनविला चिवडा । हो, घालुनी...
डाव सुखाचा कधी दुःखाचा
पडो तरी घ्यावा चिवडा ॥३॥

घ्या प्रभूनाम गा गुणगान
विनती करीते आशा मन । हो, विनती...
वासुदेव हरि म्हणत जा सदा
हेच सुखाचे निदान ॥४॥

संदेश – **बटाटा चिवडा घ्यावा.**

## ४९

# सहा साधने

ज्ञान भक्ति कर्म यांनी फुलवू जीवन
सहज साधनांनी पाहू नित्य भगवान ॥धृ॥

साधनेत साधना ती सद्भावे नमन
मनोजय *ओखदाने सुखी हो जीवन ॥१॥

स्तुति सुमनमाला हाती घेऊनिया जाण
भगवंतासी ऐक्य भावे लावू या *लगीन ॥२॥

लगनात आंदण देऊ कर्म समर्पण
अहंकार दूर करण्या हाचि राम बाण ॥३॥

उपासना नित्य करिता खूष भगवान
त्याची खुषी हेचि आम्हा महान भूषण ॥४॥

चरण स्मरण भगवंताचे दीपस्तंभ जाण
प्रकाशुनी दुरी करी विघ्ने ती दारुण ॥५॥

हरिलीला गाऊनी त्यांचे करू या श्रमण
श्रवण मनन केलीयाने जीवन पावन ॥६॥

भागिरथी माऊलीने दिधले साधन
मार्ग दाविला आशेला करी जो पावन ॥७॥

*ओखदाने – औषधाने *लगीन – लग्न

**षड्मार्ग** – १) नमन २) स्तुति ३) कर्मसमर्पण
४) उपासना ५) चरणस्मरण ६) श्रवण

५०

# कृष्ण गोविंद, गोविंद

कृष्ण गोविंद गोविंद
मना लागो छंद ॥ध्रु॥

वाचे घेता सदा नाम
पळती हे क्रोध काम (३) ॥१॥

मूर्ती ठसता हृदयांत
मन गुंते न लोभात (३) ॥२॥

वाहू पान तुळशीचे
नाम नुरे मत्सराचे (३) ॥३॥

घालू तया दंडवत
होईल मदाचा तो अंत (३) ॥४॥

आशा म्हणे एकरूपा
होई भागिरथी कृपा (३) ॥५॥

अभिप्राय :→ सौ-ज्योत्स्ना कुलकर्णी.
प्रत्येक काव्यांत आत्मानुभूती आशा सद्गुरुंची ज्योत्स्नेला
卐 ॥ आली प्रचीती ॥ 卐